**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी

आरोग्य सेवा

पत्ता:- जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी
फोन नं. :- ०२३५२ - २२२३६२ / २२२३६३
फॅक्स नं.:- ०२३५२ - २२२३६२
ई मेल : cs_ratnagiri@rediffmail.com
जा.क्र.जिशचिर/एनएचएम/पीसीपीएनडीटी/दरपत्रके/12497/२४
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय
दिनांक - 04 OCT 2024

# दरपत्रक सुचना

**विषय - रत्नागिरी जिल्हा शासकिय व खाजगी जुन्या विनावापर सोनोग्राफी मशिन निर्लेखन करणेबाबत...**

जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी सन २०२४-२५ गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व लिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ सुधारीत २००३ (पीसीपीएनडीटी) कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच नोंदणीकृत खाजगी सोनोग्राफी केंद्रांचे निकामी व विनावापर सोनोग्राफी मशिन निर्लेखन/विल्हेवाट लावणेकरीता तसेच विल्हेवाट लावल्यानंतर सदरील कचरा वाहतुक करुन घेवून जाणेकरीता खालील प्रमाणे इच्छुक नोंदणीकृत खरेदीदारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी ज्यांना त्याप्रमाणे खालील प्रमाणे सोनोग्राफी मशिन निर्लेखनाच्या स्पर्धेमध्ये भाग घ्यावयाचा असेल त्यांनी खाली सही करणार यांचे नावे दरपत्रके सादर करावयाचे आहेत.

**तपशील खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशील | संख्या | प्रति मशिन दर |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी जिल्हयामध्ये कार्यरत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच नोंदणीकृत खाजगी सोनोग्राफी सेंटरमध्ये जुन्या, विनावापर सोनोग्राफी मशिन व प्रोब निर्लेखन करणे, विल्हेवाट लावणे. त्याकरीता लागणारे रोडरोलर, व्हिडीओ शुटींग, निर्लेखित मशिनचे कचरा वाहतुक तसेच इतर याबाबतचा सर्व खर्च सविस्तर नमुद करावा. | १ | |

तरी वरीलप्रमाणे आपण मशिन निर्लेखन करुन कचरा खरेदीदारांसाठी इच्छुक असाल तर आपले बाजार भावाचे (सर्व करासहित) दरपत्रक या कार्यालयाकडे दिनांक - ११ /१०/२०२४ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत पोहोचेल या बेताने पाठवावे.

Scanned with OKEN Scanner

**लिफाफा १ (तांत्रिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) दुकान/कंपनी सुरु करणेचा परवाना
२) दुकान/कंपनी पीसीपीएनडीटी कायदा अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक
३) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र
४) व्यवसायाच्या व्याप्ती नुसार जीएसटी क्रमांक आवश्यक जर जीएसटी क्रमांक नसल्यास तसे प्रमाणित केलेले मुळ प्रमाणपत्र आवश्यक.
५) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत.
६) संबधीत व्यवसायामध्ये किमान तीन वर्ष काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्र.

**लिफाफा २ (आर्थिक) मध्ये पुढील कागदपत्र असणे आवश्यक आहे -**

१) लिफाफा दोन मध्ये सिलबंद दरपत्रक सादर करावे.

**सदरचे तांत्रिक व आर्थिक लखोटा स्वतंत्र लखोटयामध्ये सिलबंद करुन जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे नावे कार्यालयीन वेळेत हे दरपत्रक प्रसिध्द झाले पासून अंतिम तारखेपर्यंत कार्यालयात पोहोच होतील असे पाठविण्यात यावेत.**

प्राप्त दरपत्रके हि दिनांक 16/10/2024 रोजी सायं.०५.०० वाजता मा.जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांच्या दालनात उघडण्यात येतील. अटी व शर्ती तसेच दरपत्रके मंजुर वा नामंजुर करणेचा अधिकार, सदरील प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांनी आपल्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

सदरची दरपत्रके ज्यांच्या नावे मंजुर केले जाईल मंजुर दराप्रमाणे मशिन निर्लेखन करणेबाबतचे आदेश देण्यात येतील. आदेश प्राप्त झालेपासून पुढील एक वर्षासाठी दर मंजूर असतील त्यानुसार आपण निर्लेखन सेवा पुरविणे बंधनकारक राहणार आहे. तसा रु.१००/- (रुपये शंभर मात्र) चा विहीत नमुन्यातील नोटराईज्ड केलेला करारनामा संबधीत सेवा पुरवठाधाराने सादर करावयाचा आहे.

१) सदर दरपत्रक सादर करताना वरील संख्याप्रमाणे दरपत्रक सादर करावे तसेच दरपत्रकावर **सोनोग्राफी मशिन निर्लेखन दरपत्रक** असे नमुद करावे.
२) दरपत्रक सादर करावयाचा कालावधी दिनांक 04/10/24 ते दिनांक 11/10/2024 संध्या.५ वाजेपर्यंत कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून
३) दरपत्रक सादर करताना सोनोग्राफी मशिन जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी मुख्यालयी ठेवण्यात येतील. निर्लेखन करावयाची जागा आदेशामध्ये नमुद करण्यात येईल ती शासकिय

Scanned with OKEN Scanner

मालकीची असेल. निर्लेखन करताना लागणारे रोडरोलर, व्हिडीओ शुटींग, मशिन कचरा वाहतुक खर्च तसेच इतर खर्च सविस्तर नमुद करुन दर देण्यात यावे.

४) निर्लेखन प्रक्रिया पुर्ण झालेवर संबधीत सोनोग्राफी मशिन व प्रोबचे मालक, मशिनचे नाव, कपंनी, सीरीयल क्रमांक निहाय सविस्तर मशिन निर्लेखित केल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

५) सदरील प्रक्रियेसंदर्भात माहिती/शंका असल्यास खाली सही करणार यांचे कार्यालयामध्ये शासकिय कामकाजाच्या वेळेत सुट्टीचे दिवस वगळून संपर्क करण्यात यावा.

(डॉ.बी.व्ही.जगताप)
जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी

कार्यालयाचा पत्ता
मा.जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी यांचे कार्यालय,
जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयासमोर, जयस्तंभ, रत्नागिरी ता.जि.रत्नागिरी.
संपर्क क्रमांक : ०२३५२-२२२३६३, २९५४८६.

**नोटीस प्रसिध्द दिनांक :-**

**प्रसिध्दीचे स्थळ :-** जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी नोटीस बोर्ड

**शासनाचे संकेतस्थळ :** https://arogya.maharashtra.gov.in/Site/Form/Publications.aspx
https://nrhm.maharashtra.gov.in/tenders.htm